# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांक : 18.10.2026** **वार : रविवार**

## ठळक बातम्या

1. कर्करोगावरील औषधांसह 137 औषधांच्या किंमतीत घट होणार.
2. 6 महिन्यांपर्यंतच्या बालकांच्या अन्नपदार्थात सुक्रोज, फ्रुक्टोजच्या वापरावर बंदीचा अन्न सुरक्षा प्राधिकरणाचा प्रस्ताव.
3. विद्यार्थी आंदोलनातील हिंसाचाराच्या घटनेशी संबंधित चौकशीसाठी पोर्टलची सुरुवात.
4. मध्य प्रदेशात अपघातात 12 भाविकांचा तर कोलकात्यात चेंगराचेंगरीत 19 जणांचा मृत्यू.
5. भारत-वेस्ट इंडिज टी-20 मालिका बरोबरीत; दोन्ही संघांना संयुक्त विजेतेपद.

## सविस्तर बातम्या

**कर्करोग-किंमत घट**

देशात कर्करोगावरील औषधांच्या किंमतीत मोठी घट होण्याची शक्यता आहे. राष्ट्रीय औषध मूल्य निर्धारण प्राधिकरणानं या संदर्भात घेतलेल्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर कर्करोगाच्या औषधांच्या किंमतीत 70 टक्केपर्यंत घट होण्याची शक्यता आहे. प्राधिकरणानं 137 निवडक औषधांच्या विक्रीपश्चात नफ्याच्या सुसुत्रीकरणाची प्रक्रिया हाती घेतली आहे.त्यामुळे सामान्य रुग्णांना परवडणाऱ्या दरात ही औषधे उपलब्ध होऊ शकतील. या सुधारित किंमती 9 नोव्हेंबरपासून लागू होणार आहेत. सर्व किरकोळ विक्रेते आणि रुग्णालयांना कमी केलेली किंमत आकारणे बंधनकारक असेल आणि त्या किंमती विक्री केंद्रात प्रदर्शित कराव्या लागतील, अशी माहिती रसायन आणि खत मंत्रालयानं दिली आहे.

दरम्यान महाराष्ट्रात कर्करुग्णांच्या रोगनिदान, रोग स्थिती आणि उपचारांवर लक्ष ठेवण्यासाठी आवश्यक असलेली पेट सीटी स्कॅन तपासणी महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. त्यामुळे सर्वसामान्य रुग्णांवरील आर्थिक भार कमी होणार आहे. सार्वजनिक आरोग्य विभागानं कर्करोग उपचाराच्या 63 चाचण्यांमध्ये ही चाचणी अतिरिक्त निदान प्रक्रिया म्हणून जोडण्याचा निर्णय घेतला आहे.

**FSSAI**

भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण अर्थात FSSAI नं 6 महिन्यांपर्यंतच्या बालकांसाठीच्या अन्नपदार्थांमध्ये सुक्रोज आणि फ्रुक्टोज या साखरेच्या प्रकारांच्या वापरावर बंदी घालण्याचा प्रस्ताव मांडला आहे. यासंदर्भातील नियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी मसुदा प्रसिद्ध करण्यात आला आहे. बालकांचं पोषण योग्य पद्धतीनं व्हावं आणि पहिल्या 6 महिन्यांतील वाढ निकोप व्हावी हा या प्रस्तावित निर्बंधांचा उद्देश असल्याचं आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं म्हटलं आहे. या प्रस्तावावर नागरिक आणि संबंधित घटकांकडून 60 दिवसांत हरकती आणि सूचना मागवण्यात आल्या आहेत. या सूचनांचा विचार केल्यानंतर अंतिम निर्णय घेतला जाणार आहे.

**सन्या पोर्टल**

दिल्लीतील जंतर मंतर इथं आणि देशात इतरत्र जुलै महिन्यात झालेल्या विद्यार्थी आंदोलनादरम्यान झालेल्या हिंसाचाराच्या घटनांशी संबधित सर्व बाबींची चौकशी करण्यासाठी स्थापन केलेल्या उच्च अधिकार समितीने एक पोर्टल सुरू केले आहे. 'hpec.nic.in' या पोर्टलवर बाधित विद्यार्थी आणि पोलिस यांना तक्रारी दाखल करणे सुलभ होणार आहे. पॅलेट गनचा वापर, लक्ष्य करून झालेला हिंसाचार, महिला आंदोलकांचा छळ तसंच दोन्ही बाजूंकडून झालेला हिंसाचार आणि मालमत्तेचे नुकसान या बाबींना चौकशीमध्ये प्राधान्य दिले जाणार आहे. या पोर्टलमध्ये कुणाचीही ओळख उघड केली जाणार नाही, त्यामुळे आंदोलनाशी संबंधित सर्व घटकांनी या पोर्टला भेट देऊन आपल्या तक्रारी अपलोड कराव्यात असं आवाहन गृह मंत्रालयानं केलं आहे.

**खेत बचाव**

कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आगामी खेत बचाओ अभियानाच्या तयारीचा आढावा काल दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून घेतला. 22 ऑक्टोबरपासून हे अभियान 11 राज्यात राबवलं जाणार आहे. या बैठकीत कृषी आणि शेतकरी कल्याण राज्यमंत्री भागीरथ चौधरी यांच्यासह महाराष्ट्र, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, तेलंगणा, गुजरात, उत्तराखंड, राजस्थान, आसाम, हरियाणा, जम्मू-काश्मीर, आणि बिहार या राज्यांचे कृषी मंत्री सहभागी झाले होते.

**फ्रान्स-निदर्शनं**

फ्रान्समधील अनेक शहरांमध्ये पोलीस आणि निदर्शकांमध्ये हिंसक संघर्ष, मोठ्या प्रमाणावर लूटमार आणि जाळपोळीच्या अनेक घटना घडल्या. या संदर्भात 1200 हून अधिक लोकांना अटक करण्यात आली असून दीडशे पोलीस अधिकारी जखमी झाले आहेत. वाढत्या महागाईच्या विरोधात देशभर सुरु असलेल्या निदर्शनांदरम्यान काल ही हिंसा भडकली. लिमोज, ल्योन, मार्सिले आणि लिले या शहरांमध्ये सर्वाधिक नुकसान झालं आहे. तोडफोड, जाळपोळ आणि लूटमारीसाठी जबाबदार असलेल्यांवर खटला चालवून त्यांना शिक्षा दिली जाईल, असं आश्वासन राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी दिलं आहे.

**ट्रम्प पश्चिम आशिया**

इराणशी सुरू असलेले युद्ध लवकरच संपुष्टात येऊ शकते असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. केंटकी इथ ते एका प्रचार सभेत बोलत होते. आखातील प्रदेशातील संघर्षाच्या परिस्थितीचा संबंध देशांतर्गत इंधन किंमतींशी जोडत, हे युद्ध संपल्यानंतर अमेरिकेच्या ग्राहकांसाठी ऊर्जा किंमतीत मोठी घट होईल असं ट्रम्प म्हणाले. त्याचबरोबर लष्करी कारवाया थांबल्यानंतर पेट्रोलच्या किंमतीत लक्षणीय घट होईल. असंही त्यांनी सांगितलं.

**रशियासर्गेई-पूल-विजया**

रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्गेई लावरोव सोमवारी इराणला भेट देणार असून, ते इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांच्याशी चर्चा करणार आहेत. या चर्चेत इराणशी संबंधित परिस्थिती, व्यापक प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय घडामोडी आणि पश्चिम आशियातील तणाव कमी करण्यासाठी रशिया करत असलेले प्रयत्न या विषयांवर भर दिला जाईल अशी माहिती रशियन परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्या मारिया झाखारोव्हा यांनी दिली.

**भारत ब्रिटनसराव-सराव**

भारत आणि ब्रिटन यांच्यादरम्यान कोनकान या 4 दिवसांचा द्विपक्षीय सागरी सराव ब्रिटनच्या प्लायमाऊथ झाला. भारतीय नौदलाचे प्रतिनिधित्व आयएनएस त्रिशूल या स्टेल्थ फ्रिगेटद्वारे करण्यात आले, तर रॉयल नेव्हीने ड्यूक-क्लास पाणबुडीविरोधी युद्ध फ्रिगेट, एचएमएस सदरलँड, तैनात केली होती. हा सराव रॉयल नेव्हीच्या फ्लीट ऑपरेशनल स्टँडर्ड्स अँड ट्रेनिंग युनिटद्वारे आयोजित करण्यात आला होता.

**मध्य प्रदेश-अपघात**

मध्य प्रदेशात ग्वाल्हेर इथं शीतला माता मंदिराच्या बाहेर भिंतीवर ट्रक आदळून झालेल्या अपघात 12 जणांचा मृत्यू झाला; आणि 39 जण जखमी झाले. पोलिसांनी लावलेले अडथळे तोडून तीव्र उताराच्या रस्त्यावरून हा अनियंत्रित वेगातील ट्रक खाली

आला. मंदिराबाहेर असलेल्या भाविकांना चिरडून हा ट्रक थांबला. रात्री दीड वाजता ही घटना घडल्याचं स्थानिक पोलिस प्रशासनानं सांगितलं.

**कोलकाता दुर्घटना**

पश्चिम बंगालमध्ये कोलकाता इथं काल दुर्गापूजेदरम्यान संध्याकाळी झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेत 19 जणांना प्राण गमवावा लागला. तर पंचवीस जण जखमी झाले. महासप्तमीच्या पूजेदरम्यान ही घटना घडली. भाविकांची प्रचंड गर्दी आणि अचानक आलेला मुसळधार पाऊस यांमुळे पूजामंडपात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाल्यानं गोंधळाची परिस्थिती निर्माण झाल्यानं चेंगराचेंगरी झाली. जखमींना कोलकाता वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय तसंच आर जी कर आणि एन आर एस वैद्यकीय महाविद्यालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे.

पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी आणि राज्याचे आरोग्यमंत्री यांनीही रुग्णालयाला भेट देऊन आढावा घेतला. या परिस्थितीविषयी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह वरिष्ठ नेत्यांनी दुःख व्यक्त केले असून, आपत्तीग्रस्त कुटुंबियांविषयी संवेदना व्यक्त केली आहे.

घटनेतील जीव गमावलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना प्रत्येकी दोन लाख रुपये तर जखमींना प्रत्येक पन्नास हजार रुपयांची आर्थिक मदत पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून देण्याची घोषणा पंतप्रधानांनी केली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी घटनेविषयी दुःख व्यक्त केलं असून, त्यांचे पश्चिम बंगाल भेटीतील आजचे कार्यक्रम रद्द करून, ते रुग्णालयात जखमींची भेट घेणार आहेत. मृत व्यक्तीच्या नातेवाईकाला सरकारी नोकरी देण्याचा आणि 25 लाख रुपयांची मदतनधी देणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी  सांगितलं आहे. त्याशिवाय राज्यातील मंदिराच्या मंडपांच्या सुरक्षेच्या चौकशीसाठी समिती स्थापन करण्याची घोषणा केली आहे.

**आशियाई-पॅरा-गेम्स**

जपानमधील आयची-नागोया इथं आज पाचव्या 'आशियाई पॅरा गेम्स” ची सुरुवात होत आहे. 24 ऑक्टोबरपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत 18 क्रीडा प्रकारांचा समावेश असून तीन हजार खेळाडू यात सहभागी होत आहेत. उद्घाटन सोहळ्यापूर्वीच ब्लाइंड फुटबॉल, पॅरा बॅडमिंटन, पॅरा टेबल टेनिस आणि बोसिया या क्रीडा प्रकारांच्या स्पर्धेला सुरुवात होईल. उद्घाटन सोहळ्यात भारतीय पथकाचे नेतृत्व ध्वजवाहक म्हणून पॅरा-बॅडमिंटनपटू प्रमोद भगत आणि धावपटू सिमरन शर्मा करतील.

**महिला क्रिकेट**

महिला क्रिकेट मध्ये भारत आणि झिंम्बाब्वे यांच्यात आज दुसरा टी-20 सामना होणार आहे. संध्याकाळी 7 वाजता रायपूर इथं हा सामना खेळला जाईल. कर्णधार स्मृती मानधनाच्या नेतृत्वाखालील भारतीय संघानं पहिला सामना जिंकून मालिकेत एक-शून्य अशी आघाडी घेतली आहे.  तिसरा सामना येत्या 20 तारखेला होणार आहे

**क्रिकेट**

बंगळुरू इथं काल पावसामुळे भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील पाचवा टी-20 सामना रद्द झाला. त्यामुळे पाच सामन्यांची मालिका 2-2 अशी बरोबरीत सुटली आणि दोन्ही संघांना संयुक्त विजेते घोषित करण्यात आले.

हा सामना प्रत्येकी 9 षटकांचा करण्यात आला. भारताने सात षटकं चार चेंडूत 5 बाद 118 धावा केल्या. भारतीय डावानंतर पुन्हा पाऊस सुरू झाल्याने वेस्ट इंडिजसमोर 5 षटकांत 84 धावांचे सुधारित लक्ष्य ठेवण्यात आले. मात्र, पाऊस कायम राहिल्याने सामना रद्द करण्यात आला.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.